# हेराफेरीला चाप

नितीन चव्हाण
nitin.chavan@timesgroup.com



देवनार डम्पिंग ग्राऊंड येथे मुंबईच्या विविध भागांतून हजारो टन कचरा आणला जात असला तरी हा कचरा किती टन असावा याची मक्तेदारी जणू कंत्राटदारांकडे होती. त्यामुळे या कचऱ्यात रोज एक हजार टनाची बोगस भर टाकून पालिकेची चाललेली लूट ऑनलाइन नोंदणीने थांबवली आहे.

मागील दोन वर्षांपासून मुंबईत देवनार डंम्पिंग ग्राऊंड चर्चेत आहे. कचऱ्याला लागणाऱ्या आगींमुळे ही चर्चा सुरू असली तरी तसे हे डम्पिंग दोन दशकांपासून धुमसते आहे. याचे कारण कचऱ्याला आगी लागण्याचे प्रकार वर्षा-दोन वर्षांत घडत नसून मागील काही वर्षांपासून सातत्याने हे प्रकार घडत आहेत. डम्पिंग परिसरात राहाणाऱ्या नागरिकांना दमा, टीबी आणि अन्य श्वसनजन्य विकार जडत असल्याने हे डम्पिंग देवनारमधून हलवावे, अशी मागणी केली जात आहे. त्यासाठी आंदोलने आणि संघर्ष सुरू आहे. मात्र मागील ८० वर्षांहून अधिक काळ १२३ हेक्टरवर पसरलेले हे डम्पिंग दुसऱ्या भागात हलवणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही.

एकीकडे डम्पिंग दुसऱ्या भागात हलविण्याची मागणी होत असली तरी वर्षानुवर्षे जमा झालेल्या आणि रोज जमा होणाऱ्या कचऱ्याची संख्या कमी करण्याबाबत कोणत्याही उपाययोजना पालिकेकडून होत नाहीत. देवनार डम्पिंग शास्त्रोक्त पद्धतीने बंद करण्यासाठी २००८मध्ये पालिकेत प्रस्ताव मंजूर झाला. पुढील २५ वर्षे दररोज दोन हजार मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करून डम्पिंग कायमचे बंद करण्याची योजना आखण्यात आली. सुमारे साडेचार हजार कोटी रुपयांचे हे कंत्राट मंजुर झाले. मात्र आठ वर्षात डम्पिंग भूखंड पालिकेकडून भाडेपट्ट्यावर घेण्याचे कामही पूर्ण झाले नाही. त्यामुळे नियोजित काळात प्रकल्प सुरू न झाल्याने पालिकेने अखेर हे कंत्राट रद्द करून दुसरा कंत्राटदार नेमण्याची प्रक्रिया तीन महिन्यांपूर्वी सुरू केली आहे. डम्पिंगचे हे रामायण सांगण्याचे कारण म्हणजे शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प सुरू होत नसल्याने मुंबईच्या विविध भागांतून वाहनांतून कचरा वाहून आणणाऱ्या कंत्राटदारांची मात्र चांदी होत होती.

मागील काही वर्षांपासून मुंबईत दररोज सुमारे ९,४०० टन कचरा आणि १५०० टन डेब्रिज गोळा होते. यातील सर्वाधिक म्हणजे सात हजार टन कचरा देवनार डंम्पिंग ग्राऊंडवर टाकला जातो. मुंबईच्या विविध भागांतून वाहून आणलेला हा कचरा डम्पिंगपर्यंत आणण्यासाठी हजारो खासगी वाहनांची मदत पालिकेतर्फे घेतली जाते. कंत्राटदारांमार्फत चालवल्या जाणाऱ्या या वाहनांच्या वाहतुकीत भ्रष्टाचार होऊ नये म्हणून पाच वर्षांपूर्वी व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टमचा वापर करण्यात येत होता. वाहने कचरा संकलन करून देवनार डम्पिंगपर्यंत पोहचण्याचा सर्व मार्ग ट्रॅक केले जात असल्याचा दावा पालिकेने केला होता. मात्र ही यंत्रणा मोडीत काढून कंत्राटदारांनी वाहनांच्या मॅन्युअली बोगस नोंदी करून पालिकेची आर्थिक लूट सुरू केली होती. म्हणजे एका वाहनाची दिवसाला एक फेरी झाली असल्यास लॉगशीटमध्ये तीन ते चार फेऱ्या नोंद करण्यात येत होत्या. अर्थात या कामासाठी कंत्राटदारांना पालिकेचे डम्पिंगवरील कर्मचारीही मदत करत असणार हे स्पष्ट आहे. कुंपणानेच शेत खाण्याचा हा प्रकार मोडीत काढण्याचा प्रयत्न पालिकेने सुरू केला त्यास चांगलेच यश आले आहे.

### सिटीस्कॅन

कचऱ्यात चालणारी ही हेराफेरी थांबवण्यासाठी पालिकेने वाहनांची नोंदणी करणारी ऑनलाइन यंत्रणा चार महिन्यांपूर्वी सुरू केली. पहिले तीन महिने प्रायोगिक पातळीवर ही यंत्रणा पडताळून पाहिल्यानंतर डिसेंबरपासून तिची प्रशासकीय पातळीवर अंमलबजावणी सुरू करण्यात आली. खरे तर मुंबईत कचरा कमी होईल, असे कधी तरी घडणे शक्य आहे का? असा प्रश्न विचारला जात असताना हे खरोखर शक्य झाले आहे. मागील चार महिन्यात मुंबईतील कचरा तब्बल एक हजार टनाने कमी झाला. त्यामुळे कंत्राटदारांना द्यावयाच्या देयकात पालिकेचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान टळू लागले आहे. ऑनलाइनमुळे डम्पिंग ग्राऊंडमध्ये आलेल्या प्रत्येक वाहनाची नंबरप्लेट स्कॅन केली जात असून कचरा भरलेला असताना गाडीचे वजन, कचरा टाकल्यानंतरचे वजन, गाडी किती वाजता डम्पिंग ग्राऊंडमध्ये आली, किती वाजता बाहेर पडली याची नोंद होत आहे. या यंत्रणेची माहिती फक्त संबंधित इंजिनीअर आणि लेखा परीक्षकांना उपलब्ध असल्याने मागील चार महिन्यांपासून दररोज फक्त ८,३०० ते ८,४०० टन इतकाच कचरा मुंबईतून गोळा होत असल्याची ऑनलाइन नोंद झाली आहे. कचरा वाहून आणणाऱ्या गाड्यांच्या फेऱ्यांची नोंद करण्याचा मानवी हस्तक्षेप थांबला असून सर्व काम ऑनलाइन होत आहे. हाच प्रयोग मुलुंड आणि कांजूर डम्पिंग ग्राऊंडवर देखील लवकरच सुरू करण्याचे प्रशासनाने निश्चित केले आहे. देवनारमध्ये वापरलेली हीच पद्धत पालिकेने आता नालेसफाई, सफाई कामगारांचे साहित्य, शालेय विद्यार्थ्यांना देणाऱ्या २७ शालेय वस्तूंच्या वाटपातही अनुसरण्याची गरज आहे. नालेसफाईत दररोज लाखो टन गाळ काढला जात असल्याची कागदोपत्री नोंद होत असली तरी प्रत्यक्षात तितका गाळ काढला जात नाही. गाळाच्या वजनातील, वाहनांच्या फेऱ्यांतील हा बोगसपणा मागील वर्षी उघडकीस आल्यानंतर खळबळ उडाली होती. त्यामुळे देवनारचा यशस्वी प्रयोग पालिकेतील पुढील सर्व भ्रष्टाचाराच्या वाटा बंद करणारा , अशी अपेक्षा ठेवायला हरकत नाही.

मटा

**GODFREY PHILLIPS INDIA LIMITED**
**REGISTERED OFFICE :** 'Macropolo Building', Ground Floor, Next to Kala Chowky Post Office, Dr. Babasaheb Ambedkar Road, Lalbaug, Mumbai - 400 033
**CORPORATE OFFICE :** 49, Community Centre, Friends Colony, New Delhi - 110 025
**CIN NO.:L16004MH1936PLC008587**
**Website: www.godfreyphillips.com; Email: isc–gpi@modi.com**

**NOTICE**

Pursuant to Regulation 29(1)(a) read with Regulation 47(1)(a) of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, it is hereby notified that a Meeting of the Board of Directors of the Company will be held on Thursday, the 2nd February, 2017 at 3.45 P.M. to, inter-alia, consider, approve and take on record of the Standalone Unaudited Financial Results for the third quarter ended 31st December, 2016.

The information contained in this notice is also available on the Company's Corporate website www.godfreyphillips.com and on the website of the stock exchanges, www.bseindia.com and www.nseindia.com.

**For GODFREY PHILLIPS INDIA LIMITED**
Sd/-
(Sanjay Gupta)
Company Secretary

Place : New Delhi
Dated : 25th January, 2017

IRB
INFRASTRUCTURE DEVELOPERS LTD

**IRB INFRASTRUCTURE DEVELOPERS LIMITED**

Registered Office: 3rd Floor, IRB Complex, Chandivli Farm, Chandivli Village, Andheri (E), Mumbai-400 072
Tel. No: (022) 6640 4220, Fax No: (022) 6675 1024, e-mail: info@irb.co.in, Website: www.irb.co.in
CIN: L65910MH1998PLC115967

HIGHWAYS ● BRIDGES ● TUNNELS ● TOLL-ROADS ● AIRPORTS

**UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED DECEMBER 31, 2016**

(₹ in Crores, except share data)

| Particulars | CONSOLIDATED | | | STANDALONE | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 3 months ended 31.12.2016 (Unaudited) | 9 months ended 31.12.2016 (Unaudited) | 3 months ended 31.12.2015 (Unaudited) | 3 months ended 31.12.2016 (Unaudited) | 9 months ended 31.12.2016 (Unaudited) | 3 months ended 31.12.2015 (Unaudited) |
| Total income from operations (net) | 1,410.89 | 4,218.81 | 1,333.32 | 799.25 | 2,402.75 | 803.50 |
| Net Profit / (Loss) from ordinary activities before tax | 254.14 | 685.60 | 228.55 | 0.71 | 51.44 | 119.20 |
| Net Profit / (Loss) from ordinary activities after tax | 184.22 | 508.24 | 167.90 | 0.10 | 34.50 | 99.97 |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 184.08 | 508.23 | 167.70 | 0.61 | 34.39 | 99.95 |
| Equity Share Capital | 351.45 | 351.45 | 351.45 | 351.45 | 351.45 | 351.45 |
| Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) | - | - | - | - | - | - |
| Earnings per share (of ₹10 each) Basic and Diluted (₹) (*not annualized) | 5.24* | 14.46* | 4.78* | 0.00* | 0.98* | 2.84* |

**Note :**
The above is an extract of the detailed format of Financial Results filed with the stock exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. Investors can view full format of Quarterly results of the company on the company's website **(www.irb.co.in)** or on the websites of BSE **(www.bseindia.com)** or NSE **(www.nseindia.com).**

For **IRB INFRASTRUCTURE DEVELOPERS LIMITED**

sd/-
Virendra D. Mhaiskar
Chairman & Managing Director

Place : Mumbai
Date : January 25, 2017

IRB/Kautilya-347

महाराष्ट्र टाइम्स जय हिंद

CONSUMER CONNECT INITIATIVE

# मुलांचा प्रजासत्ताक दिन

प्रजासत्ताक दिन किंवा स्वातंत्र्यदिनाकडे सुट्टीचा दिवस म्हणून पाहण्याची अनेकांची मानसिकता बनली आहे. त्यामुळे अलिकडे हा दिवस उत्साहात, आनंदात साजरा करणे हळूहळू बंद होत आहे आणि हळूहळू मुलंही त्यांचंच अनुकरण करताना दिसतात. या दोन दिवशी मनसोक्त झोप आणि आराम असा एक दिनक्रम बऱ्याच घरांमध्ये दिसतो. मुख्यत: नोकरदार पालकांच्या घरी हे चित्र आवर्जून पाहायला मिळतं. हे चित्र बदलणं आवश्यक आहे जेणेकरून पुढल्या पिढीमध्येही राष्ट्रप्रेमाची भावना जागृत होईल. काही छोट्या-मोठ्या गोष्टींमधून ते साधता येईल.

आपला राष्ट्रध्वज तिरंगी आहे. तो कसा आणि कोणी तयार केला याची माहिती मुलांना काही कलाकुसर करताकरता देता येईल. रंगीत कागदांचा ध्वज बनवता येईल, मुलांना आकर्षित करण्यासाठी तिरंगी ब्रेसलेटही बनवता येईल. तसंच मुलींसाठी तिरंगी रिबीनही बनवता येईल. घरात भगव्या, पांढऱ्या आणि



हिरव्या अशा तीन रंगांच्या फुग्यांनी सजावट करा.

मुलांनी स्वातंत्र्याचा आदर करावा असं वाटत असल्यास त्यांना ते स्वातंत्र्य मिळवण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी किती कष्ट घेतले हे सांगणं गरजेचं आहे. त्यासाठी सिनेमा हे प्रभावी माध्यम आहे. स्वातंत्र्यसेनानींची माहिती देणारे बाल-चित्रपट किंवा माहितीपटही त्यांना दाखवा.

स्वातंत्र्याच्या लढाईचे पुरावे असलेल्या स्मारकांची सहल करून त्यामागचा इतिहास मुलांना सांगावा. इंडिया गेट, जालियनवाला बाग, लाल किल्ल्यासारख्या ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या ठिकाणांची एक सहल जरूर करावी. ते शक्य नसल्यास इंटरनेटवरून या स्थळांची आभासी सहल करता येईल. स्वातंत्र्यपूर्व आणि नंतरचं जीवन यावरची माहितीही मुलांना देता येईल.

**- टीम मटा**
mtartnedit@timesgroup.com

# ध्वजसंहिता

राष्ट्रीय प्रतीक असणाऱ्या आपल्या तिरंगी ध्वजाचा मान राखणं, हे आपल्या सर्वांचंच कर्तव्य आहे. त्यासाठी तिरंग्याची संहिता जाणून घेऊ या.

- १९५० मध्ये भारत प्रजासत्ताक झाल्यावर ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डने १९५१ मध्ये प्रथमत: ध्वजासंदर्भात काही नियम जाहीर केले. १९६४ मध्ये यात बदल करण्यात आले. १७ ऑगस्ट १९६८ रोजी यात आणखी काही बदल केले. ध्वजाचा आकार, निर्मिती, रंग, आदी सर्वच बाबतीत हे नियम लागू करण्यात आले. ते तंतोतंत पाळणं बंधनकारक आहे.
- राष्ट्रीय प्रतीक असणाऱ्या तिरंग्याच्या बाबतीत कोणताही हलगर्जीपणा चालत नाही. निर्मितीपासून ध्वजारोहण आणि ध्वज उतरवेपर्यंत एखादी चूक झाल्यास तो गुन्हा मानण्यात येतो. अशी चूक करणाऱ्या व्यक्तीला दंड किंवा तुरुंगवास किंवा या दोन्ही शिक्षा होऊ शकतात.
- दरवर्षी साधारण चार कोटी ध्वजांची विक्री होते. खादी किंवा हाताने कातलेल्या सुतापासूनच हा ध्वज बनवायला हवा.
- २००२ पूर्वी सामान्य जनता राष्ट्रीय कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर कधीही ध्वज फडकवू शकत नव्हती. पण उद्योगपती नवीन जिंदाल यांनी दिल्ली कोर्टात केलेल्या जनहित याचिकेनंतर सामान्य जनतेलाही राष्ट्रध्वज फडकवण्याची मुभा मिळाली.
- २६ जानेवारी २००२ पासून राष्ट्रीय ध्वजसंहितेत बदल करण्यात आले. बदलण्यात आलेल्या या नियमांनुसार ध्वजाचा मान, सन्मान आणि आदर राखत कोणत्याही दिवशी सर्वसामान्य माणूस ध्वजारोहण करू शकतो.
- नियमानुसार ध्वजाला जमीन किंवा पाण्याला स्पर्श होऊ देऊ नये.
- २००५ पर्यंत युनिफॉर्म किंवा कपड्यांवर ध्वज लावता येत नव्हता. पण ५ जुलै २००५ रोजी करण्यात आलेल्या बदलांनुसार राष्ट्रध्वज कपड्यांवर लावता येतो. मात्र, तो कंबरेखाली लावणं कायद्याने गुन्हा आहे.
- सूर्योदयाच्या वेळी ध्वजारोहण आणि सूर्यास्ताच्या वेळी ध्वज उतरवणं कायद्याने बंधनकारक आहे.
- काही खास प्रसंगी सार्वजनिक इमारतींवर रात्रीच्या वेळेसही ध्वज फडकवता येतो.
- राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री आदी महत्त्वाच्या व्यक्तींच्याच गाडीवर राष्ट्रध्वज लावण्यास परवानगी आहे. अन्य कोणालाही आपल्या गाडीवर ध्वज लावता येत नाही. तसंच राजकीय महत्त्वपूर्ण व्यक्ती परदेशात जात असल्यास त्या विमानावर राष्ट्रध्वज लावता येतो.
- महत्त्वाच्या व्यक्तीचे निधन झाल्यास ध्वज अर्ध्यावर उतरवण्यात येतो.
- झेंडे विविध आकारात मिळतात. त्यात ६ बाय ९ इंची कार फ्लॅग सगळ्यात छोटा असून तो कारसमोर, टेबलवर पाहायला मिळतो. त्यासह ८ बाय १२ फूट, ४ बाय ६ फूट, ३ बाय ६ फूट, २ बाय ३ फूट अशा अनेक आकारांत उपलब्ध आहेत. यात सगळ्यात मोठ्या झेंड्याचा आकार १४ बाय २१ फूट इतका आहे.

**- टीम मटा**
mtartnedit@timesgroup.com



**वंध्यत्व असणाऱ्या दांपत्यासाठी मोफत तपासणी शिबिर**

आय.व्ही.एफ क्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन

दि. २७ व २८ जानेवारी २०१७

● पूर्वनियोजित नोंदणी आवश्यक ● मोफत सल्ला व तपासणी

सेंटर १ : बांद्रा
वेळ : स. १०.०० ते दु. २.०० वा.
LILAVATI HOSPITAL (Bloom IVF Center)
२ रा मजला, बांद्रा (प.), मुंबई-५०.

सेंटर २ : नेरुळ
वेळ : स. १०.०० ते दु. २.०० वा.
D. Y. PTIL FERTILITY CENTER
४ था माळा, डी विंग, सेक्टर ५, नेरुळ, नवी मुंबई-७०६

सेंटर ३ : ओपेरा हाऊस
वेळ : दु. २.०० ते संध्या. ४.०० वा.
BABIES & US FERTILITY, IVF CENTRE (I) PVT. LTD.
५३४, बॉम्बे म्यूचल टेरेस, ४ मजला, ओपेरा हाऊस, मुंबई -०७.



टेली. : 09309421016 / 01414156667
Email : bloomivfmumbai@gmail.com
Website : www.bloomivf.com

उपलब्ध सेवा :
• (IMSI, IUI, IVF, ICSI) TEST TUBE BABY
• EGG BANKING • LASER HATCHING
• TREATMENT FOR BLOCKED TUBES ENDOMETRIOSIS & PCOD.
• TREATMENT FOR POOR SPERM COUNT.

गर्भलिंग निश्चिती व लिंग निवड या तपासण्या बेकायदेशीर असून त्यावर भारतात बंदी आहे आणि या तपासण्या आमच्या येथे केल्या जात नाही.

CMS

lenseye
OPTICS & CONTACT LENS CLINIC
a lifetime of care

जुन्या ५०० आणि १००० ₹ नोटांचे = मूल्य नाही*
जुना चष्मा = ५०%*

पैशांचा संपूर्ण मोबदला देणारी ऑफर*

जुन्या चष्म्याच्या एक्सचेंजवर ५०%* पर्यंत डिस्काऊंट मिळवा

| नाव | वय* | डिस्काऊंट* |
|---|---|---|
| अमिताभ | ७४ वर्षे | किमान ५०% |
| शाहरूख | ५१ वर्षे | किमान ५०% |
| ऐश्वर्या | ४३ वर्षे | ४३% |
| दिपीका | ३१ वर्षे | ३१% |
| विराट | २८ वर्षे | २८% |
| सिंधू | २१ वर्षे | २१% |

*वयाचा दाखला आवश्यक

ही ऑफर २५ ते ३१ जानेवारी, २०१७ पर्यंत उपलब्ध

सर्व क्रेडीट आणि डेबिट कार्डे स्विकारली जातील. मोफत वायफाय सुविधा उपलब्ध.

आपले 'व्हिजन'लॉयल्टी प्रोग्रॅम कार्ड मिळवा

*अटी लागू

UBIQUITAS

जगातील नावाजलेले ब्रँडसूचे : चष्मे | कॉन्टॅक्ट लेंसेस | सनग्लासेस | एक्सेसरीज

• अंधेरी(पू): २६८४ २६६३ • बोरीवली (प): २८९१ ६३४१ • चर्चगेट: २२८२१४२६ • माटुंगा: २४०४ ३०३० • सीवुडस्: २७७० ४८२५ • वाशी: २७८९ ३१००

At lenseye we provide the correct eye wear for every eye.